**दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्रक सादर केल्याशिवाय आपले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**दरपत्रक भरण्यापुर्वी खालील सुचना, अटी व शर्ती काळजी पुर्वक वाचाव्यात.**

# दरपत्रकाच्याअटी व शर्ती

१) दिनांक **08/10/2025** ते दिनांक **14/10/2025** रोजी दुपारी ठिक.५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत लिफाफा बंद दरपत्रके स्विकारण्यात येतील. टपालाने अथवा कुरियर सेवामार्फत पाठविलेल्या दरपत्रक विलंबाने प्राप्त झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

२) दिनांक **15/10/2025** रोजी सकाळी **11.30** वाजता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छ.संभाजीनगर यांच्या दालनात खरेदी समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील इच्छुक दरपत्रक धारक अथवा त्यांचा अधिकृत पत्र असलेला प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची अनुमती आहे.

३) **दर**:- सुवाच्य अक्षरात व अंकात नमुद करावे, खाडाखोड नसावी. खाडाखोड असलेला फॉर्म विचारात घेतला जाणार नाही. दर सर्व करासहीत (Inclusive of all taxes) आणि कार्यालयात माल पोहोच Store Delivery तत्वावर असतील. दरपत्रक सादर करते वेळी अनुज्ञेय असलेले सर्व शासकीय कर विचारात घेऊन दर भरावे. भविष्यात कोणत्याही करामध्ये वाढ झाल्यास दर वाढवुन दिला जाणार नाही, मात्र करामध्ये कपात झाल्यास मंजुर केलेल्या दरामधुन तेवढी रक्कम वजा करुनच देयकाची अदायगी केली जाईल. अनुज्ञेय असलेला कर वेळेवर शासनास न भरता, कर चुकवेगिरी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास आपले दरपत्रक व पुढील कालावधीतील पुरवठा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येऊन आयकर विभाग तसेच शासनाचे विक्रीकर विभागाकडे आपली तक्रार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) **पुरवठा कालावधी**:- आदेशाच्या दिनांकापासुन **"सात"** दिवसाच्या आत साहित्यांचा पुरवठा करावा लागेल. अत्यावश्यक वेळी **"तात्काळ"** पुरवठा करणे बंधनकारक राहील.

५) **दंड** :- उपरोक्त नमुद कालावधीत पुरवठा न केल्यास विलंबाच्या कालावधीसाठी **0.5%** प्रति सप्ताह या दराने दंड आकारण्यात येईल.

६) पुरवठा करावयाच्या बाबी नमुद विनिर्देशाप्रमाणे (Specification) असणे बंधनकारक राहील. विनिर्देशाप्रमाणे (Specification) नुसार पुरवठा केला नसल्याचे निदर्शनास आल्यास त्या बाबी पुरवठाधारकास त्यांच्या स्वखर्चाने परत घेवुन जाव्या लागतील, तसेच तात्काळ नवीन पुरवठा मोफत करणे बंधनकारक राहील.

७) दरपत्रकातील रकाना क्र.१ वर दर्शविलेली संख्या अंदाजित असुन कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कमी जास्त करण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

८) न्युनतम दर असलेल्या पुरवठादाराने रुपये १०० च्या बॉन्ड पेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे आणि त्यानुसार पुरवठा करण्यास संमती देण्याबाबतचा करारनामा लिहून द्यावा लागेल. त्यानंतरच अंतिम दर स्विकारण्यात आल्याचे घोषित होईल, तद्नंतर गरजेनुसार पुरवठा आदेश देण्यात येईल.

९) दरपत्रकात कोणत्याही बाबीच्या न्युनतम दरात साम्य आढळून आल्यास विभागुन देणे अथवा एखाद्याचा दर स्विकारणे याबाबतचा अंतिम निर्णय निविदा समितीचा असेल.

१०) कोणत्याही स्वरुपात देयकाची आगाऊ (Advance Payment) रोख रक्कम मिळणार नाही. तसेच देयकाची अदायगी PFMS (Cashless Transaction) पध्दतीनेच करण्यात येईल या करिता सोबतचा फॉर्म मध्ये आपल्या बँक खात्याची सविस्तर माहिती सादर करणे बंधनकारक राहिल.

कृपया पान ३ पाहा...

११) दरपत्रकावरील दर स्विकारल्याच्या दिनांकापासुन पुढील एक वर्षाकरीता वैध राहतील. पुरवठादाराची सेवा व दर समाधानकारक असल्यास आणि भविष्यात गरज असल्यास पुढील ३ महिन्याकरीता मुदत वाढ (Extension) देण्यात येईल.

१२) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेतच पुरवठा स्विकारला जाईल.

१३) दरपत्रकामधील नमुद बाबींचे शासनामार्फत दरकरार झाल्यास त्या बाबींची खरेदी निविदाधारकाकडून करणे या कार्यालयावर बंधनकारक असणार नाही.

१४) दरपत्रकाच्या कालावधीत पुरवठादाराने पुरवठा आदेशानुसार साहित्याचा पुरवठा न केल्यास व जे साहित्य जादा दराने इतर पुरवठादाराकडुन घेणे भाग पडल्यास **"अतिरिक्त फरकाची रक्कम"** पुरवठादाराच्या पुढील देयकाच्या रकमेतुन वसुल केली जाईल.

१५) पुरवठादाराने त्याची कोणतीही अट किंवा शर्त दर पत्रकात नमुद करु नये तसे केल्यास दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही.

१६) निविदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन कार्यवाहीसाठी छ.संभाजीनगर (मुख्यालय) राहील.

१७) कोणतेही संपुर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार **"जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, छ.संभाजीनगर"** यांनी राखुन ठेवलेला आहे. (Civil Surgeon, District Hospital, Chh. Sambhajinagar has been reserved all rights, to accept or reject any or all quotation without any reason; at any stage of quotation process)

१८) दरपत्रकासोबत स्वयं साक्षांकित (Self Attested) केलेली खालील वैध प्रमाणपत्रके सादर करावीत.

| क्र. | सादर करावयाची आवश्यक प्रमाणपत्रके |
|---|---|
| 1 | दरपत्रक सादर करण्याबाबतचे विनंतीपत्र Annexure – A |
| 2 | RTGS/NEFT करीता बँक खात्याची सविस्तर माहितीचा फॉर्म. Annexure – B |
| 3 | खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबतचे आणि संस्थेचे एकल दरपत्रक असल्याचे हमीपत्र. Annexure – C |
| 4 | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्था/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (अद्यावत नुतनीकरण पाहिजे) |
| 5 | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी व अदयावत विक्रिकर निपटारा प्रमाणपत्र. |
| 6 | मागील ३ वर्षाचे (Income Tax Return 2021-22 to 2023-24) आयकर भरल्याचे प्रमाणपत्र. |

उपरोक्त अ.क्र. १ ते १८ अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला मान्य आहेत.

स्थळ - पुरवठादाराची स्वाक्षरी

दिनांक- पुरवठादाराचे नांव / फर्मचा शिक्का

कृपया पान ४ पाहा...

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

## Annexure-A

Date- / /

To

**Civil Surgeon,**
Civil Hospital,
Chh.Sambajinagar.

**Subject: - Quotation for** All in One Computer & All in One Printer

**Reference: – Your office Notice Dated**

With reference to above subject .We are herewith submitting following item rate for Government purchase.

| Sr. No. | Particular | Qty | Rate (Inclusive All Tax ) |
|---|---|---|---|
| 1 | **All in One Desktop**<br>(16GB Ram/512 GB SSD/Win 11/Microsoft 365 Basic + Office Home 2024/3Wx2 Speakers/5MP Camera/Wireless Keyboard + Mouse) | 1 Nos. | |
| 2 | **All in One Printer**<br>Automatic Duplex Laser Printr with 30 Pages per Minute Print Speed, Multifunction (Print Scan Copy), 2 in 1 (ID) Copy Button, LCD Display, 32 MB Memory, 250 Sheet Paper Tray, USB | 1 Nos. | |

**Noted Before Filling Quotation Rate**

1) Rates – Inclusive of all Taxes
2) Delivery – 48 Hours. Twice in week

Enclosed Documents self attested

**Yours faithfully,**

**Supplier Stamp & sign**

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

## Annexure- B

### Details of Bank for RTGS/NEFT Payment

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of firm | |
| 2 | Postal Address | |
| 3 | Pin code | |
| 4 | Pan Card No. | |
| 5 | E-Mail I.D. | |
| 6 | Contact No. | |
| 7 | Mobile No. | |
| 8 | Name of Bank | |
| 9 | Bank Address | |
| 10 | Brach name & Code | |
| 11 | Bank Account No. | |
| 12 | Nature of Account | |
| 13 | IFSC Code | |
| 14 | MICR Code | |

Above information is correct as per our record.

Date:

Seal:

Sign & Stamp Of Bidder

कृपया पान ६ पाहा...

दरपत्रक भरणाऱ्या पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सदरील माहिती सादर करावी.

## Annexure- C

# निविदाकाराचे हमीपत्र

**महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भागIII/उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर २०१६, नियम ४:२:५ नुसार**

मी / आम्ही..............................................................................या हमीपत्राव्दारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविणाऱ्या खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबध नसुन हितसंबधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधीकाऱ्याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करुन दरपत्रक भरलेले नाही, असे आढळुन आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक :

ठिकाण :

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का